


0

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

 ISBN 978-93-913-05-62-8

# अनुक्रमणिका

## १) नोबेल पारितोषिक प्राप्त अभिजीत बॅनर्जी यांचे योगदान


| अ.क्र. | शोध निबंध | शोध निबंध लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | अभिजित बॅनर्जी यांचे दारिद्रय निर्मूलन संदर्भात आर्थिक विचार : एक अभ्यास | डॉ. एस. एल. मेंढे | २ |
| २ | बॅनर्जीची दारिद्रयाबाबतची भुमिका व वास्तविकता | डॉ. वैशाली ल. देशमुख नाईक | ६ |
| ३ | अभिजित बॅनर्जी यांचे आर्थिक विचार आणि भारतीय अर्थव्यवस्था | डॉ. समित लक्ष्मण माहोरे | ११ |
| ४ | बिकट परिस्थितीसाठी उत्तम अर्थशास्त्र : अभिजीत बॅनर्जी यांचे विश्लेषण | डॉ. प्रशांत हरमकर | १८ |
| ५ | नोबेल पारितोषिक प्राप्त अभिजित बॅनर्जी यांचे योगदान | प्रा.डॉ. संजय व्ही. भामरे | २७ |
| ६ | अभिजित बॅनर्जी यांचे गरीबीविषयक विचार | डॉ. संगीता भालचंद्र काटकर | ३१ |
| ७ | अभिजीत बॅनर्जी यांच्या दारिद्रय संकल्पनेची चिकित्सा | माधव शिंदे | ३५ |
| ८ | अभिजित बॅनर्जी यांचे अर्थशास्त्रीय विचार | डॉ. नितीन अशोक मुरकुळे | ३६ |
| ९ | अभिजित बॅनर्जी यांचा गरिबीचा सिध्दांत | डॉ. विशाल भाऊसाहेब पावसे | ४० |
| १० | डॉ. अभिजित बॅनर्जी यांच्या दृष्टीकोनातून अन्न सुरक्षा योजनेचे मूल्यमापन | पंकज मा. तायडे | ४४ |
| ११ | डॉ. अभिजीत बॅनर्जी : दारीद्रय विषयक संशोधन व समकालीन संदर्भातील योगदान | प्रो. डॉ. अनिलकुमार वावरे | ५१ |
| १२ | अभिजीत बॅनर्जी यांचे अर्थशास्त्रातील योगदान | डॉ. सुनिता विजय रणाते | ५७ |
| १३ | नोबेल पारितोषिक प्राप्त अभिजीत बॅनर्जी यांचे योगदान | प्रा. डॉ. सुहास आव्हाड<br>प्रा. डॉ. प्रियंका खोसे | ६३ |
| १४ | अभिजीत बॅनर्जीचे अर्थशास्त्रातील योगदान-विशेष संदर्भ डॉ. लतिफ जमिल पॉवर्टी एक्शन लॅब(J-PAL) | डॉ. कुमुदिनी भा. जोगी | ६९ |
| १५ | अर्थशास्त्रातील नोबेल २०१९ - डॉ. अभिजीत बॅनर्जी | प्रा. डॉ. परशुराम पाटील | ७४ |




Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN 978-93-913-05-62-8

# बॅनर्जीची दारिद्र्याबाबतची भुमिका व वास्तविकता

डॉ.वैशाली ल. देशमुख नाईक
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद
आजीव सभासद क्र.११८४
मो.क्र.९४२२१९०८५१

**प्रस्तावना :—**

ऑक्टोबर २०१९ मध्ये नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेला दारिद्र्याचा प्रश्न, त्यांचे अनुभवनिष्ठ अध्ययन व त्यावर सुचविलेले उपाय हे आजमितीला किती महत्वाचे आहे सर्व ज्ञात आहेच. अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकेल क्रेमर यांनी आशिया व आफ्रिका खंडामध्ये असणारे कमी उत्पन्न गटातील देश यांचा दारिद्र्याबाबत व विकासाच्या संदर्भात जो अभ्यास केला, जागतिक पातळीवरील दारिद्र्य कमी करण्यासाठी कोणते उपाय करणे गरजेचे आहे याचा अनुभवनिष्ठ अध्ययनाला पुरस्कार प्राप्त झाला आहे.

बॅनर्जी यांनी याविषयी जो अभ्यास केला व भारतातील शासनाची दारिद्र्याचा प्रश्न सोडवण्या संदर्भातील व्यूहनिती यांची सांगड घालता येते का ? किंवा बॅनर्जींनी सुचविल्याप्रमाणे शासन स्तरावर भारतात प्रयत्न झाले आहेत का ? याचा आढावा या लेखात घेतला आहे.

**दारिद्र्याचा प्रश्न :—**

जीवनावश्यक गरजा पुर्ण करु न शकणारा व्यक्ती दरिद्री म्हणून सर्वसाधारणतः समजला जातो. दारिद्र्याच्या संदर्भात अनेक वेगवेगळ्या निर्देशंकाचा आधार घेतलेला आहे. प्रामुख्याने न्छव ने दरडोई उत्पन्नाच्या आधारे जे उत्पन्न गट निश्चीत केले आहेत त्यानुसार दरडोई ९३६ डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्न असणारे व्यक्ती व ते देश निम्न उत्पन्न गटात येतात. ज्या देशांना आपण अविकसित देश संबांधतो. परंतु बॅनर्जी यांनी गरीबीच्या संदर्भात वेगवेगळ्या कसोट्यांच्या आधारे विचार मांडले आहेत. त्यांच्या मते गरीबी दुर करण्यासाठी योग्य प्रकारे गुंतवणुक होणे गरजेचे आहे. परंतु गरीब व्यक्तीला मुळात गुंतवणुक करणे कठीण असल्याने गरीबीच्या दृष्टचक्रात अडकावे लागते. काही थोडी प्रमाणात गुंतवणुक करु शकणारे लोक प्रगती होण्याच्या मार्गावर असतात असे लक्षात आले. कारण आपले आजचे उत्पन्न किती आहे व यावर उद्याचे उत्पन्न अवलंबुन असतं. म्हणुन गरीबीच्या दृष्टीचक्रातुन लोकांना बाहेर काढणे गरजेचे आहे असे बॅनर्जी म्हणतात.

दारिद्र्याच्या संदर्भात बॅनर्जी व डुफ्लो यांनी जगभरातुन माहिती गोळा केली व त्यांना वेगवेगळे अनुभव यामधुन प्राप्त झाले. त्यांना आढळले की, गरीब लोक अन्नापेक्षाही इतर गोष्टींना अधिक महत्व देतात. जसे ते टिव्ही, वा इतर करमणुकीची महत्वाची साधने आणतात. यावर खर्च करणे त्यांना गरजेचे वाटते. तसेच सण समारंभ यांच्यावर खर्च होतो. म्हणजे त्यांना जीवन आनंददायी जगण्यासाठी पोटभर अन्न हवे असा विचार न करता ते इतर खर्चांना महत्व देतात. भारतात तर अनेक गरीब आज काटकसर करुन भविष्यात मुलीच्या खर्चाची तजबीज करुन ठेवतात. म्हणजे अन्न कमी घेतले तरी हरकत नाही असे त्यांना वाटते.

रॅग्नर नर्क्स यांनी जे दारिद्र्याचे दृष्टचक्र मांडले ते बॅनर्जींना पुर्णतः मान्य नाही. गरीब व्यक्ती उपासमारीमुळे गरीबीच्या दृष्टीचक्रात अडकत नाही. परंतु पौष्टीक अन्नाच्या अभावामुळे मात्र त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. बॅनर्जीच्या मते गरीबांना सवलतीत अन्न पुरवठा केला जातो. परंतु तो पौष्टीक नसतो. परिणामी कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होतो.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

 ISBN 978-93-913-05-62-8

**आरोग्याचे दृष्टीचक्र :—**

आरोग्य हे अनेक दृष्टचक्राच्या मुळाशी असते. पौष्टीक, पोटभर अन्न मिळाले तर आजारपणाचा दर कमी होईल व कार्यक्षमता सुधारुन उत्पन्नपातळी वाढेल. याबरोबरच स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची उपलब्धता याचाही आरोग्याशी जवळचा संबंध त्यांनी अधोरेखित केला. बॅनर्जीच्या अध्ययनानुसार गरीब लोकांना सेवा मोफत असाव्या असे वाटते. परंतु मोफत आरोग्य सेवांची किंमत किंवा महत्व त्यांना नसते. यांचे महत्वाचे कारण म्हणजे आरोग्याबाबतची उदासिन वृत्ती हे आहे. स्वस्त आरोग्यसेवा उपलब्ध असल्या तरी स्वस्त परंतु चांगल्या दर्जाच्या रोगप्रतिबंधक सुविधांचा वापर टाळला जातो. कारण गरींबांना एक मोठा गैरसमज असतो की, स्वस्त वस्तु बिनकामी असतात, त्याचा खुप फायदा होत नाही. याचाच अर्थ असा की, उद्या मिळणाऱ्या फायद्यासाठी आज काही त्याग करणे गरजेचे असते. हा त्याग टाळल्यामुळे ते फायद्यापासून वंचित राहतात.

आरोग्य हे अनेक दृष्टचक्राचे कारण असते. अनारोग्याचे प्रमाण कमी करुन सुदृढ पिढी निर्माण व्हावी यासाठी लोकांनी उपलब्ध आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा. आफ्रिकेतील तसेच भारतातील अनेक ठिकाणाच्या पाहणीवरुन त्यांना हेच आढळले की, हिवताप, डायरीया, यासारख्या आजारामुळे दरडोई उत्पन्न घटले आहे. म्हणून यापासून दूर राहण्यासाठी लोकांनी थोडाफार आधी खर्च केला तर त्यांची या आजारापासून मुक्तता होईल व निश्चीत दरडोई उत्पन्न वाढेल. यासाठी स्वच्छ पाण्याचे पाणी व स्वच्छतागृहांच्या वापरावर बॅनर्जी भर देतात. यासाठी साधारणत: प्रतिकुटुंब दरमहा २० डॉलर्स एवढा खर्च होऊ शकतो परंतु विकसनशील, अविकसीत देश तो खर्च करण्यास टाळतात व आजारांना बळी पडतात. स्वच्छ पाण्यासाठी क्लारीनचा वापर अतिशय कमी खार्चिक आहे तर हिवतापाचे मुळ असणाऱ्या डासांपासून मुक्ततेसाठी मच्छरदानीचा वापर सोपा आहे. परंतु लोकांची मानसिकता ते वापरण्याची नसल्याने आजारपणात वाढ होते, यासाठी गरीब लोकांच्या विचारप्रणालीत बदल बॅनर्जींना अपेक्षित आहे.

**शिक्षण :—**

जागतिक मानव विकास अहवालामध्ये मांडलेल्या प्रमुख निर्देशकांमध्ये उत्पन्न, आरोग्य आणि शिक्षण हे महत्वाचे आहेत. शिक्षण हा निर्देशक उत्पन्न व आरोग्य या निर्देशकावर सकारात्मक परिणाम करणारा असल्याचे स्पष्टच आहे. जगात विकसनशील व अविकसित देशामध्ये शिक्षण सुविधा मोफत व मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे बरेच ठिकाणी गरीबी हे शिक्षण न घेण्याचे कारण नाही. तर बरेच ठिकाणी मुलांनी शाळेत जाण्याबाबत पालकांची अनास्था, त्यांचा पाठपुरावा कमी आढळला. बॅनर्जीच्या पाहणीवरुन असे आढळले की, मुलांवर अपेक्षांचे आझे थोडे कमी करणे गरजेचे आहे. मुलांच्या कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित केले, तसेच पुरक शिक्षणासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली तर निश्चीतच फायदा हाऊ शकतो.

**ऋणकोची स्थिती :—**

बॅनर्जीच्या मते गरीबांना कर्ज मिळण्याबाबतचा मुद्दा लक्षवेधी ठरावा. गरीब लोक कर्ज घेताना बॅक किंवा सहकारी संस्था यांना प्राधान्य देण्याऐवजी खाजगी क्षेत्राकडून कर्ज घेण्याला प्राधान्य देतात. अविकसित देशात सावकार, नातेवाईक, दुकानदार अशांकडून गरीबांचे कर्ज घेण्याचे प्रमाण ६० ते ८० टक्के असल्याचे पाहणीत आढळते. बॅका व सहकारी संस्थाही गरीबांना कर्ज देताना आढेवेढे घेतात. म्हणुनच बॅनर्जी यांच्या मते गरीबी कमी करण्यासाठी लघुकर्जाचे वाटप वाढविणे गरजेचे आहे. बांग्लादेशात महंमद युनुस यांनी व कलकत्याला 'स्पंदना' संस्था चालविणाऱ्या पद्मजा रेड्डी यांचा लघुकर्ज वाटपातुन गरिबांना केलेल्या आर्थिक मदतीबाबत कौतुकास्पद उल्लेख केला. लघुकर्ज बुडविणाऱ्या समस्येविषयी मात्र बॅनर्जींनी खंत व्यक्त केली. शेतकरी आत्महत्येमागे लघुकर्ज कंपन्या



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

 ISBN 978-93-913-05-62-8

जबाबदार असल्याचे राजकारणी लोकांनी उठविल्यामुळे या लघुकर्ज देणाऱ्या कंपन्यावर विपरीत परिणाम झाल्याचेही त्यांना अनुभवास आले. कंपन्यांच्या विरोधात लोकांना भडकविण्याचे काम अनेकांनी केले, लोकांची दिशाभुल केली. परिणामी कंपन्यांचे व गरीब लोकांचेही नुकसान झाले असे निदर्शनास आले.

गरीबांना कर्ज घेण्यामागची कारणे प्रामुख्याने मांडतांना बॅनर्जी म्हणतात की, बचत कमी, उत्पन्न कमी अशी स्थिती गरीबांची असते. गॅरी बेकर यांच्यानुसार बचत करण्याची क्षमता असणारे बचत करतात परंतु ज्याची क्षमताच नाही असे बचत करु शकत नाही. आणि त्यांची सोशिकता संपली की भविष्याबाबतचा कायमस्वरुपी दिलासादायक दृष्टीकोन अल्पकालीन व अनिश्चीत बनतो. गरीबांच्या बॅक खात्याबाबत हेच आढळले की, त्यासाठी पैसा खर्च करावा लागतो म्हणुन बॅक खाते उघडण्याला ते उत्सुक असतात.

**कृषी व उद्योग :—**

बॅनर्जीच्या अनुभवजन्य अभ्यासातुन हे प्रामुख्याने त्यांना जाणवले की, नावीन्य आणि उद्योजकता गरीबांमध्ये असते. तसे लघुउद्योजक क्रियाशील व चिकाटीने काम करणारे असतात. परंतु त्यांना यश मिळतेच असे नाही. त्याला अनेक कारणे आहेत. ग्रामीण बॅकेचे जनक महंमद युनुस यांच्या मते गरीब लोक हे निसर्गत:च उद्योजक असतात. म्हणुन सी.के.प्रल्हाद यांच्यानुसार तळागळातल्या लोकांवर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. या दोन्ही लोकांच्या मताला बॅनर्जी अतिशय कौतुकास्पदरित्या मान्य करतात व यासाठी सरकारी क्षेत्राप्रमाणे खाजगी क्षेत्रानेही कर्ज वाटप करुन गरीबांना प्रोत्साहन द्यावे असे मत मांडतात.

ग्रामीण भागात शेती उत्पादन वाढावे यासाठी शेतजमीनीत खतांचा वापर महत्वाचा आहे. परंतु गरीब शेतकरी त्याचा वापर करु शकत नाही. म्हणुन शेतकऱ्यांनी शेती उत्पादन वाढवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचा योग्य वापर करावा असे सुचविले. बॅनर्जीच्या मते ग्रामीण व्यक्ती बचत करण्यासाठी स्वत: तयार होणे गरजेचे आहे. त्यासाठी स्वनियंत्रण आवश्यक आहे. आपल्याला कशा प्रकारच्या अडचणी उद्‌भवू शकतात याचा लोकांना अंदाज आल्यास त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्या प्रयत्नांमध्ये स्वनियंत्रण गरेजेचे मानले आहे. यासाठी ते पद्‌मजा रेड्डी या लघुकर्ज घेणाऱ्या महिलांविषयीच्या विश्वासाचे उदाहरण देतात. वायफळ खर्च कमी करुन भविष्यासाठी निधी साठविणे लक्षात आल्याने दिर्घकालीन उद्‌दीष्टे पुर्ण करण्यासाठी लघुकर्ज घेणे हा सोपा मार्ग असल्याचे अनुभवाच्या आधारे मांडले आहे.

बॅनर्जीनी कृषी बरोबर औद्योगीक विकासही महत्वाचा मानला आहे. ग्रामीण भागाजवळच उद्योग सुरु झाले तर ग्रामीण लोकांना शेतीव्यतिरीक्त रोजगार उपलब्ध होईल व उत्पन्नपातळी वाढेल. म्हणुनच नियमित उत्पन्न दारिद्र्य कमी करण्यासाठी गरजेचे आहे. बॅनर्जीना आलेल्या अनुभवानुसार लोक कमी वेतन असले तरी सरकारी नोकरीला प्राधान्य देतात कारण त्यात निश्चीतता असते. तसेच नोकरी मिळवण्यासाठी स्थलांतर करण्यास लोकांचा उत्साह खुप नसतो. एका पाहणीमध्ये बॅनर्जीना असे आढळले की, लोक कायमस्वरुपी स्थलांतराऐवजी तात्पुरत्या स्थलांतरास तयार असतात. परिणामी उत्पन्न वाढवण्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

**दारिद्र्य कमी करण्यासाठीचे उपाय :—**

जयपुर लिटरेचर फेस्टीवल मध्ये बॅनर्जी यांनी दारिद्र्य कमी करण्यासाठी काही ठोस उपाय मांडले. त्यांच्यामते भारताला दारिद्र्यातुन बाहेर पडायचे असेल तर मोठा काळ जाऊ द्यावा लागेल. कारण अर्थव्यवस्था प्रगत करण्यासाठी, कठीण परिस्थीतीतुन बाहेर पडण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे एकाचवेळी अनेक घटकांवर काम केले तर दारिद्र्याचे प्रमाण घटेल. एकुणच



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

 ISBN 978-93-913-05-62-8

मागणीचे प्रमाण कमी असल्याने व उत्पन्नाबाबत खात्री नसल्याने लोक खर्च करण्याचे टाळतात. सॅख्स यांच्या मते विकसनशील देशांमध्ये दारिद्रय कमी करण्यासाठी फक्त धोरणे आखुन चालणार नाही तर त्यांची योग्य अमंलबजावणी गरजेची आहे. जाहीर केलेली मदत पुर्णत: गरजू लोकापर्यंत पोहचणे यामध्ये अपेक्षित आहे. विकसनशील देशामध्ये या मदतीला अनेक ठिकाणी गळती लागल्याने गरजुपर्यंत मदतीचे प्रमाण कमी होते. म्हणुन यासाठी सरकारी धोरणे अमंलबजावणीवर प्रभाव पाडणारी असावीत. तसे बाजारपेठा व सरकारी धोरणे यांच्यात समन्वय गरजेचा आहे.

बॅनर्जीच्या मते भारतात एक चांदीची बंदूक गोळी निर्माण करण्यापेक्षा गवताचे बिछाने तयार करणे गरजेचे आहे. कारण ते बिछाने गरीबांच्या उपयोगी पडतील. लोक वेगवेगळ्या प्रकारच्या दारिद्र्याला सामोरे जात आहेत. जसे शिक्षणाचे दारिद्रय, आरोग्यविषयक दारिद्रय, निवास दारिद्रय. या दारिद्रयातुन बाहेर पडण्यासाठी मदतीची गरज आहे. मदतीमुळे गरीबांना काम करण्याची उर्जा मिळेल. परंतु अपात्र लोकांना मदत मिळाली तर गोंधळ निर्माण होतो अशी शंकाही ते व्यक्त करतात. बॅनर्जीनी गरिबी दूर करण्यासाठी शासनकर्त्यांची जबाबदारी मान्य केली आहेच. परंतू त्यांच्यामते सक्षम व परिणामकारक शासनासाठी तशीच विरोधी पार्टी असणेही गरजेचे आहे. विरोधक कमकुवत असले तर शासन हुकूमशहा बनतात व आर्थिक विकासाचे फक्त मोहजाळ दिसेल. प्रत्यक्षात विकास दिसणार नाही. जर शासनाने योग्य माहिती उपलब्ध करुन न देता दिखावूपणा केला तर विदेशी गुंतवणूकदार नाराज होतील. म्हणून जागतिक सहभाग वाढवायचा असेल तर विदेशी गुंतवणूकदारांना योग्य माहिती उपलब्ध करुन देणे शासनाचे कर्तव्य असल्याचे बॅनर्जी मांडतात.

**दारिद्रय दूर करण्यासाठी भारतात केले गेलेले उपाय :—**

भारत सध्या जरी जलद विकास होणारा देश असला तरी २०२० मध्ये भारतात जवळपास ७ मिलीयन लोकांचा रोजगार कमी झाला परिणामी उपभोग्य व्यय कमी झाला. सार्वजनिक व्यय सुध्दा घटला व दारिद्रयाचे प्रमाण वाढले. अजूनही जवळपास सरासरी २२% लोक भारतात दारिद्रयात आहेत तर जगात हे प्रमाण १८% आहे.

बॅनर्जीनी सुचविल्याप्रमाणे दारिद्रय कमी करण्यासाठी भारतातही बरेच प्रयत्न झाले ज्यामध्ये सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना स्वयंरोजगार कार्यक्रम, मजूरी रोजगार कार्यक्रम तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, भारत निर्माण योजना, इंदिरा आवास योजना, दुष्काळ ग्रस्त भागातील कार्यक्रम, किमान गरजा कार्यक्रम अशा विविध योजना राबविल्या गेल्या. ज्यामुळे दारिद्रयामध्ये घट होण्यास मदत झाली त्याचप्रमाणे बॅनर्जीनी सुचविल्याप्रमाणे लघुकर्ज उपलब्धता व्हावे यासाठी शासनामार्फत लघू व कुटीर उद्योगांना कर्ज पुरवठा व्हावा यासाठी निधी उपलब्ध करुन देत आहेच परंतु यामध्ये वाढ झाल्याचेही निदर्शनास येते. तसेच बचतीची सवय लागावी यासाठी बॅक खाते प्रत्येकाचे असावे यादृष्टीने भारतात प्रत्येक नागरिकांचे जनधन खाते उघडले गेले. याशिवाय स्वयंरोजगार, कौशल्य विकास कार्यक्रमाचा माध्यमातून रोजगार निर्मितीवर भरविला जात आहे.

गरिबांना अन्न पुरवठा योग्य प्रमाणात व्हावा यासाठीची भारतातील सार्वजनिक वितरण प्रणाली एक उत्तम उदाहरण आहे. आरोग्य विषयक सुविधांच्या बाबतीतही शासनाचे धोरण कौतुकास्पद आहे. यामध्ये करोना लसीकरण असो किंवा पोलिओ लसीकरण असो. दारिद्रय कमी करण्याचे शासनाचे प्रयत्न व त्याला सर्व लोकांची सहकार्याची व समर्थनाची भावना गरजेची आहे.

**समारोप :**

अभिजीत बॅनर्जी यांनी दारिद्रयावर मांडलेले अनुभवजन्य विचार दारिद्रयाची भीषणता व्यक्त करतात. गरीब लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी ज्या प्रकारे प्रयत्न होणे गरजेचे आहे ते काही प्रमाणात कमी पडतात तर काही ठिकाणी लोकांची मानसिकता त्या प्रयत्नांमध्ये बाधा, निर्माण



College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

 ISBN 978-93-913-05-62-8

करतात. यासाठी लोकांचे सहकार्य, उपायांकडे सकारात्मकता ठेवून बघणे याची नितांत गरज आहे. तसेच विरोधाला विरोध अशी राजकारण्यांची भुमिका नसावी तर चांगल्या धोरणांचे समर्थन करणे, उपयोगी सूचना करणे व कामात अडथळा न आणता लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अशी भुमिका शासनकर्ते व विरोधी पक्ष यांची असेल तर बॅनर्जीच्या उपायांनुसार दारिद्रय कमी होण्यास जास्त वेळ लागणार नाही हे निश्चित.

**संदर्भ :–**


१. Understanding Development & poverty Alleviation, The Committee for the Prize in Economic Science in Memory of Alfred Nobel, Kungl Vetenskaps Akademien, 14 Oct-2019.

२. Speech by Dr.Banarji in Jaipal literate festival, 27th Jan-2020.

३. अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफलो – गरिबीचे अर्थकारण, अनुदान – अतुले कहाते, मनोविकास प्रकाशन.

४. Indian Economy, Rudra Dalta Sundaram, S. Chand Publication.

५. https://www.intstady.in




PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad